अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

# मनोगत



क्रमांक ४ ऑक्टोबर २००६



## हरबा आणि केरबा

(हरबा हातात खरेदीच्या दोन तीन पिशव्या घेऊन घरी चालला आहे. रस्त्यात त्याला केरबा दिसतो.)

हरबा : राम राम केरबा ...

केरबा : राम राम, नवीन कापडं खरेदी केली वाटतं ?

हरबा : सेलमधून घेऊन आलोय. वळखीचा दुकानदार व्हता. सणासुदीला उधार देतो म्हणल्यावर केली खरेदी.

केरबा : पण मागच्या महिन्यात टीवी अन् सीडी प्लेयर पण घेतलास ना ?

हरबा : पोरगं लई मागं लागलं होतं, म्हणून हप्त्यावर घेतलाय. एक दोन वर्षात फिटुन जाईल.

केरबा : सणाआधीच ? सणासाठी काय ठेवतोस का नाही ?

हरबा : करायचं की सणाला बी. पण केरबा, सगळा पैका देणी देण्यात जातोय बघ. आण्णा सावकाराकडं जाऊन आलोय. बायकोचं डोरलं ठेवून पैसे देतो म्हणालाय. मग आणतो फराळाचं जिन्नस, फटाकं...

केरबा : मला एक सांग हरबा, तुजं टपाक टपाक गळणारं छप्पर केलंस का दुरूस्त ? पोरगी लग्नाची हाय ना तुजी, तिच्यासाठी काय ठेवलयस का बाजूला ? बायकू तुजी आजारी असतीया, तिला नेलं का दवाखान्यात ?

हरबा : पैशाचं झाड हाय व्हय घरी ? मर्दा, एवढा सण झाल्यावर बघता येईल काय करायचं ते .

केरबा : शाब्बास बहाद्दर, पोराच्या टीवीसाठी पैसे हायत तुझ्याकडं. आधीच शाळेला दांड्या मारत होता. आता काय आनंदच ?

हरबा : ते बी खरंच हाय म्हणा.

केरबा : अन् पैशाचं झाड ना ? मी लावलंय ना घरात.

हरबा : चेष्टा करतुस का रे ?

केरबा : चेष्टा कशाला करू. झाड यायला आधी रोपटं लावाया नको व्हय ? मागल्या वर्षी माझ्याबरूबर तुला बचत खातं काढ म्हणत होतो. तू काय काढलं नाहीस. त्या खात्यात माझे बक्कळ पैसे साठल्यात. पोरगं पण इंजिनियर व्हईल पुढल्या वर्षी अन् लागंल की कमवायला. ही काय पैशाची झाडं नाहीत व्हय ? फळ लगीच लागत नाही रोपटं लावल्यावर. वर्षानुवर्षं झटावं लागतं, वाट पहावी लागतें. झाड पैशाचं असू दे नाय तर कशाचं बी, मोहर आल्यावर लगीच ओरबाडून नाय चालत.

हरबा : बरूबर हाय तुझं, पण दुसरी लोकं करत्यात, आपण कराया नगु व्हय ?

केरबा : आथरूण पाहून आपलं पाय पसरावं, बेडकी फुगून थोडीच बैलाएवढी होणार? जाता जाता तुला एवढंच सांगतो, कमवायला जशी आपण अक्कल वापरतो तशीच खर्च करताना पण अक्कल वापरली पायजे, नायतर कर्जाचं ओझं काय हटायचं नाही. निघतो मी. पोराला पुस्तकं आणायच्यात. दुकान बंद होईल . राम राम.

हरबा : राम राम. (स्वत:शीच) किती बरं झालं असतं मी मागल्या वर्षीच त्याचं ऐकलं असतं तर ..

---

**कबीर कोमल व ममताळू आहे, तो दिवसभर आपल्या छोट्या बहिणीला सांभाळतो.**



**मुलगा असो वा मुलगी, दोघांना समान संधी**



## तुमच्या सूचना आम्हाला अवश्य कळवा


UpLift *India Association*

*Enriching lives of the poor... Together*

१४, लँडमार्क अपार्टमेंट,
बी जे रोड, साधु वास्वानी सर्कल,
पुणे ४११००१

फोन : ००९१(२०) २६०५ १०१३
ईमेल : upliftindia@gmail.com


**आमच्या परिवारातील संस्थांशी संपर्क साधा :**

- अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन (APVS)

फोन : ०२०-२५४४७७९१

- पर्वती स्वयंरोजगार (PSW ),

फोन : ०२०-२४ ४४ ०९ ७६

- विकास युवा संस्था (VYS)

फोन : ०२०-२४ ४४ ०९ ७६

-स्नेहदीप जनकल्याण फाऊंडेशन ( SJF)

फोन : ०२० - २६ ४५ ७१ ०५

-दिशा केंद्र (DK )

फोन : ०२०-२६ ६८ ४० ७९

- अन्नपूर्णा महिला मंडल कोऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी (AMMCCS )

फोन : ०२२ - २४ ३० ८८ ७४

- नवनिर्माण समाज विकास केंद्र (NSVK )

फोन : ०२२ -२८ ८८ ४८ ०९

-स्वयं शिक्षण प्रयोग (SSP )

फोन :०२२-५५ ८४ १३ ८८

# तुमचे आरोग्य तुमच्या हाती....

हे चित्र नीट पहा आणि त्यात आरोग्याला घातक अशा कोणकोणत्या सवयी / पद्धती दिसत आहेत ते शोधून काढा.



## या महिन्याची गुरूकिल्ली....



ऐक माझी ओवी गं।

करीन स्वच्छता घरात गं।

परसा मधला केर कचरा

**नाही** ढकलणार शेजीत ग।